# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०२ जुलै, २०२६ / आषाढ ११, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

**मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील माथाडी कामगारांच्या २७ एकर भूखंडाच्या हस्तांतरण व पुनर्विकास संदर्भात झालेली अनियमितता**

**(१) * ३६४१७ श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील माथाडी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी राखीव असलेला सुमारे २७ एकर भूखंड विशाल सह्याद्री नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेला हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडापैकी केवळ २.८१ एकर भूखंडाचे वर्ग-१ (मालकी हक्क) मध्ये रूपांतर झाले असतानाही संपूर्ण २७ एकर भूखंडासाठी खाजगी विकासकासोबत विकास हक्क करार करून मूळ अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी २१५४ सदस्यांपैकी सुमारे ९०६ सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय घरांची विक्री, भाडेपट्टा किंवा तारण व्यवहार केले असून त्यातून मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय,

मौजे कांदिवली येथील स.नं. १४९ मधील २७ एकर ३४ गुंठे शासकीय भूखंड “कापड बाजार व दुकान मंडळ, मुंबई” यांना ९० वर्षाचे भाडेपट्ट्याने मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी विशाल सह्याद्री संस्थेस, शासन

ज्ञापन दिनांक ०७/०२/१९८३ अन्वये निवासी प्रयोजनासाठी ११२५४.३० चौ.मी., तसेच मंदिराकरीता ३३४.४५ चौ.मी. असे एकूण ११,५८८.७५ चौ.मी. क्षेत्र कब्जेहक्काने प्रदान केले आहे. तसेच सदर संस्थेस शासन ज्ञापन दिनांक १४/१०/२०२४ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक १४/११/२०२४ च्या आदेशान्वये ९९,११६ चौ.मी. क्षेत्र भाडेपट्टयाने प्रदान केले आहे. असे एकूण १,१०,७०४.७५ चौ.मी. क्षेत्र संस्थेस प्रदान करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

विशाल सह्याद्री संस्थेकडे, कब्जेहक्काने प्रदान केलेल्या ११,५८८.७५ चौ.मी. क्षेत्रापैकी ११,२५४.३० चौ. मी. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक१४/११/२०२४ च्या आदेशाने व भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या एकूण ९९,११६ चौ.मी. क्षेत्रापैकी ७२२१६ चौ.मी. शासनाच्या पूर्व मान्यतेने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १४/११/२०२४ रोजीच्या आदेशान्वये, असे एकूण ८३,४७०.३ चौ.मी. क्षेत्र हे वर्ग-१ मध्ये रुपांतरीत केले आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरण करुन दिल्यानंतर संस्थेने दिनांक ०५/०३/२०२६ रोजी विकास करारनामा केला असल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला यांच्या दिनांक २३/०६/२०२६ रोजीच्या अहवालान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या निदर्शनास आली आहे.

(३) हे खरे नाही.

संस्थेने त्यांना भाडेपट्टयाने व कब्जेहक्काने प्रदान केलेल्या जमिनीचा वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणेबाबत विनंती केल्यानुसार शर्तभंग नियमानुकूल केल्यानंतरच भोगवटादार वर्ग-१ चे रुपांतरण शुल्क वसुल करुन संस्थेस सदर जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करुन देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(२) * ४००२३ श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत २,३८८ अनुदानित वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये सुमारे ९९,७७२ मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थीनी दरवर्षी शिक्षण घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृहांची योजना १०० % शासकीय अनुदानावर चालत असून तेथे २४ तास सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणतीही शासकीय सुट्टी व रजा देण्यात येत नसून अत्यंत तुटपुंज्या ‘मानधनावर’ ठेवून त्यांच्याकडून वेठबिगारीसारखे काम करून घेतले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि आदिवासी विकास विभागाच्या सन १९६७ मध्ये सुरू झालेल्या आश्रमशाळा व संलग्न वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेऊन नियमित वेतनश्रेणी दिली जात असताना छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून सन १९०१ मध्ये सुरू केलेल्या वसतिगृह योजनेतील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी दिली जात नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वसतीगृहातील कर्मचारी संघटनेने अन्यायकारक मानधन पद्धतीविरोधात दिनांक २६ व २७ डिसेंबर, २०२२ रोजी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे काढलेल्या मोर्चा दरम्यान तसेच दिनांक १२ जानेवारी, २०२३

रोजी मुंबई येथे मा. मुख्यमंत्री महोदयांनी व विभागाच्या सचिवांनी "शासकीय बैठक आयोजित करून  न्याय दिला जाईल" असे लेखी आश्वासन दिले असताना त्यावर अद्यापही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करून नियमित वेतनश्रेणी किंवा किमान वेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक १६ मार्च, १९९८ मधील आठ (ब) नुसार शासनाने मंजूर केलेल्या मानधना इतकीच किमान रक्कम संबंधित स्वयंसेवी संस्थेने स्वनिधीमधून संबंधित कर्मचारी यांना मानधनापोटी देणे आवश्यक आहे.सदरहू स्वयंसेवी संस्था या सामाजिक सेवा म्हणुन हे कार्य करीत असून, शासन त्यांना सहाय्य म्हणुन सहायक अनुदान देते. सबब या संस्थांनी स्वतःच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमधून शासनाच्या अनुदानाशिवाय येणारा खर्च भागवून कर्मचा-यांच्या मानधनासाठी येणारा जादाचा खर्च स्वनिधीमधून करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेशित/विदयार्थ्यांना दर्जेदार भोजनासह आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

(४) सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहांतील कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (सा.न्या.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० मे, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. तसेच, दरम्यानच्या कालावधीत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीने या स्वयंसेवी संस्था संचलित  अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत शिफारस केलेली आहे. या अनुषंगाने स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) लागु नाही.

-----------------

## अमरावती येथील आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्तपदी पूर्णवेळ अधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(३) * ३४७१८ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त (ATC) कार्यालयात माहे जानेवारी, २०२६ पासून पूर्णवेळ अधिकारी नियुक्त नसल्यामुळे मागिल चार महिन्यांपासून विभागाचे कामकाज प्रभारी अधिकाऱ्यांमार्फत सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयाकडे सुमारे रु.५०० कोटीचे बजेट, १२ जिल्ह्यांचा कार्यक्षेत्र व सात लाखांहून अधिक आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य जोडलेले असतानाही पूर्णवेळ अधिकारी नियुक्त न करता नागपूर येथील अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आल्यामुळे प्रशासनावर कामकाजाचा ताण येऊन

सात प्रकल्प कार्यालयांचे कामकाज विस्कळीत झाले असून स्वयंयोजना, ठक्कर बाप्पा योजना, पारधी जमाती पॅकेज, आदिवासी शेतकरी योजना प्रभावीपणे राबविण्यात अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यालयांतर्गत ३०० हून अधिक शाळा व वसतिगृहांचे नियोजन असूनही केवळ पूर्णवेळ अधिकारी नसल्याने ४ हजार कर्मचाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती व इतर प्रशासकीय निर्णय प्रलंबित राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदर रिक्त पदावर पूर्णवेळ अधिकारी नियुक्त करून विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळणे, योजनांची अंमलबजावणी व प्रशासन सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक वुईके :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे, खरे नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रकल्प कार्यालयाकडून केली जाते. सदर योजनांवर संनियंत्रण अपर आयुक्त, अमरावती यांचेमार्फत केले जाते तसेच सदर कार्यालयाकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो. त्यामूळे विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीत कोणतेही अडथळे निर्माण झालेले नाहीत.
(३) हे, खरे नाही.

समुपदेशानाच्या धोरणानुसार गट-क संवर्गातील पदाची बदली प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच पदोन्नतीच्या व सरळसेवेच्या कोट्यातील ज्या संवर्गातील पदे रिक्त आहेत त्या संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) अपर आयुक्त, अमरावती या पदावर सक्षम अधिकाऱ्याची नियमित नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कन्नड व सोयगाव (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत प्रलंबित असलेली कामे सुरू करण्याबाबत

**(४) * ३६७८२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत सुरू असलेली सिंचन विहिरी, गोठे आणि मातोश्री पांदण रस्त्यांची कामे विविध संप आणि तांत्रिक कारणांमुळे बंद झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक सहाय्यक दिनांक १२ ते २३ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान संपावर होते तसेच दिनांक १ एप्रिल, २०२६ पासून ग्राम रोजगार सेवक संपावर असल्याने हजेरी पट नियमित भरले जात नसल्याने मजुरांना रोजगारापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लॉगिन पासवर्डची तांत्रिक अडचण आणि कनिष्ठ अभियंत्यांवरील कामाच्या अतिरिक्त ताणामुळे सुमारे ५,५०० मनुष्यदिनांचे (Man-day) हजेरी पट 'झिरो' (शुन्य) झाले असल्यामुळे मजुरांना १०० दिवसांच्या कामाची हमी मिळणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सोयगाव (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत मंजूर असलेली अनेक कामे संकेतस्थळ सुरु नसणे, तसेच सर्व्हर डाऊन या तांत्रिक कारणांमुळे व प्रशासकीय दिरंगाईमुळे पूर्णपणे बंद झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणी व संबंधित विभागीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कामे प्रलंबित राहिल्यामुळे हजारो मजुरांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह उक्त तालुक्यातील तांत्रिक अडचणी दूर करून मग्रारोहयो अंतर्गत प्रलंबित कामे सुरू करून मजुरांना मजुरी मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भरत गोगावले :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

तथापि, सदर कालावधीत आयुक्त, मनरेगा नागपूर यांच्या सूचनेनुसार नियमित कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना मागणीनुसार मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले होते.संपाच्या कालावधीत मजुरांची कामाची मागणी प्राप्त नसल्याने मस्टर निर्गमित करण्यात आले नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनामार्फत राज्यात नव्याने E-MB (Electronic Measurement Book) प्रणाली लागू करण्यात आली होती. सदरची प्रणाली नव्याने असल्याने कन्नड तालुक्यात काही प्रमाणात तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे निर्गमित करण्यात आलेली ४३९ हजेरी पत्रके रद्द केली गेली.केंद्र शासनामार्फत तांत्रिक अडचणीचे निरसन झाल्यानंतर सदर हजेरी पत्रके पुनश्च:नविन ई-मस्टर निर्गमित करुन मजुरांच्या मागणीनुसार मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

ज्या ग्रामपंचायतींमध्ये २० पेक्षा अधिक कामे सुरु आहेत,अशा ग्रामपंचायतीमध्ये नविन कामे घेता येत नाहीत. मजुरांचे स्थलांतर काही प्रमाणात ऊस तोडीसाठी झालेले आहे.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

ज्या ठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या त्या ठिकाणी अडचणींचे निराकरण करुन पुनश्च:ई मस्टर निर्गमित करुन मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

-----------------

## मौजे विकासवाडी ते कलांबरेकी (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथील सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(५) * ३९०४१ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विकासवाडी ते कलांबरेकी, आदिवासी वस्ती (ता.भिवंडी, जि.ठाणे) या मार्गावार राज्य शासनाच्या ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारीत कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधण्याचे काम मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी १७ लाख ४९ हजार ९३३ रुपये खर्च दाखविण्यात आला असूनही सदर निधी रस्त्याच्या कामाकरिता खर्च करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी कोणताही नविन सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार झाला नसून जुने प्रलंबित कच्चे रस्तेच असल्याचे स्थानिक ग्रामस्थांकडून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारीत कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत मोजे विकासवाडी ते कलांबरेकी, आदिवासी वस्ती, (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी संबंधित दोषीवर कोणती कारवाई वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक वुईके :** (१) व (२) हे खरे नाही.

विकासवाडी ते कलांबरेकी,आदिवासी वस्ती (ता.भिवंडी, जि.ठाणे) या मार्गावर ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत काम करण्यात आलेले नाही.
(३) सदर रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र. २१ ते विकासवाडी ते स्मशानभुमी ते कलांबरेकी ग्राम दैवत स्थानच्या पुढे पर्यत असून, रस्त्याचा दर्जा हा ग्रामीण मार्ग क्र.२३ आहे. या रस्त्याची एकुण लांबी १.०० कि.मी आहे. रस्त्याच्या एकूण लांबी पैकी सा.क्र.०/००ते ०/१०० कि.मी. (विकासवाडी पर्यत) मध्ये रस्त्याचा पृष्ठभाग खडीकरणाचा आहे. पुढील सा.क्र.०/१०० ते ०/२५० कि.मी. रस्त्याचा पृष्ठभाग सिमेंट कॉक्रीटीकरणाचा आहे. सदरचे काम ३०५४ १९९६ मार्ग व पुल (सर्वसाधारण) या योजनेतून सन २०१८-१९ मध्ये करण्यात आलेले आहे. तसेच सा.क्र.०/२५० ते ०/४०० कि.मी. (स्मशानभुमीपर्यत) मध्ये रस्त्याचा पृष्ठभाग खडकरणाचा असून उर्वरित सा.क्र.०/४०० ते ०/८०० कि.मी (कलांबरेकी ग्राम दैवत स्थान) पर्यत पुर्णत: कच्चा रस्ता आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### बीड जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनाच्या मावेजा वाटपात झालेला गैरव्यवहार

**(६) * ३२४२८ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला वाढवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे बनावट आदेश काढून शासनाची ७३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी लातूर येथून अटक केल्याचे दिनांक ८ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हाधिकारी दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी या पदावरून कार्यमुक्त होऊन बदलून गेल्यानंतरही त्यांनी त्यांच्या कार्यकाळातील दिनांक १ मार्च, ते १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान भूसंपादनाचे बनावट आदेश काढण्यात आले असून उक्त आदेशांद्वारे १५४ प्रकरणांमधील मोबदला २४१ कोटी ६२ लाख रुपयांनी वाढविण्यात आला असून यातील ७३ कोटी ४ लाख रुपयांचे प्रत्यक्ष वाटपही संबंधित खातेदारांना झाले असून याची नोंद शासनाकडे नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासह भूसंपादन प्रक्रियेत बनावट कागदपत्रे, फेरफार व संगनमत रोखण्यासाठी लागू केलेली ई-नोंदणी, आधार प्रमाणीकरण व ब्लॉकचेन आधारित नोंद प्रणाली त्याचप्रमाणे डिजिटल लँड रेकॉर्ड, GIS मॅपिंग व ई-मावेजा प्रणाली लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या धुळे-सोलापूर या महामार्गामधील बीड जिल्ह्यातील संपादनाखालील जमिनीशी निगडीत लवाद आदेशासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या बदलीनंतर जुन्या तारखा टाकून तत्का. लवाद तथा जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी नमूद करुन लवाद आदेश निर्गमित केलेल्या प्रकरणामधील फिर्यादीवरून तत्का. जिल्हाधिकारी यांना दिनांक ७ मे, २०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.
(२) या संदर्भातील एकूण १५४ मुळ प्रकरणामधील निवाड्याची रक्कम रुपये ६८.५८ कोटी वरून मा. लवादाने ३१०.२० कोटी पर्यंत वाढ केल्याचे तसेच त्यापैकी ७३ कोटी रुपये संबंधित भूधारकांना भूसंपादन जायकवाडी प्रकल्प व उपविभागीय अधिकारी, बीड कार्यालयाकडून वाटप झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियमांतर्गत भूसंपादनाचा मोबदला संबंधित भूधारकाची मालकी हक्काशी संबंधित तसेच बँक खात्याशी निगडीत कागदपत्रांची छाननी केल्यानंतरच केंद्रशासनाच्या भूमिराशी पोर्टल मार्फत वाटप केले जाते.

-----------------

## राज्यातील गुणनियंत्रण निरीक्षकांची संख्या कमी न करण्याबाबत

**(७) * ३५९३१ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशके मिळण्यासाठी कृषी विभागाकडून तपासणी मोहीम राबविण्यासाठी नेमण्यात आलेला तालुका उपविभागीय जिल्हास्तरीय पथकातील निरीक्षकांची संख्या ९२ वरून ३३ पर्यंत कमी करण्यात आल्याने आगामी काळात शेतकऱ्यांना दर्जेदार खते मिळणार नसल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यात एकूण ९२ निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून हे अधिकारी विविध कंपन्यांच्या गोदामामधून आणि विक्रेत्याकडून बियाणांचे नमुने घेऊन त्यांची तपासणी करीत होते मात्र गतवर्षी कृषी विभागाने निर्णय घेऊन गुणनियंत्रण निरीक्षकाची संख्या कमी केल्याने सदर तपासणी मोहीम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शेतकऱ्यांना दर्जेदार खते वेळेत मिळण्यासाठी गुणनियंत्रण निरीक्षकांची पदे कमी न करता पूर्वीप्रमाणेच राज्यातील सर्व जिल्ह्यात निरीक्षकांची पदे कायम ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) हे खरे नाही

कृषि निवष्ठा गुण नियंत्रण निरीक्षकांची संख्या दिनांक ६ एप्रिल २०२६ च्या अधिसूचनेद्वारे ४८३वरुन ८७९ इतकी वाढविण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यात २ पुर्णवेळ निरीक्षक नियुक्त केले आहेत. तसेच राज्यस्तर, विभागस्तर व जिल्हास्तरावरील भरारी पथकांची संख्या पुर्वीप्रमाणेच करण्यात आली आहे. त्यामुळे गुणनियंत्रणाचे कामकाज सुरळीतपणे होणार आहे.

छ.संभाजीनगर विभागामध्ये गुणनियंत्रण निरीक्षकांची यापूर्वी संख्या २८ इतकी होती. सदर संख्या वाढून आता ६४ झाली आहे.
(३) दिनांक ६ एप्रिल, २०२६ च्या अधिसूचनेद्वारे गुणनियंत्रण निरीक्षकांची पदे वाढविण्यात आली आहेत. तसेच भरारी पथकांची संख्या पुर्वीप्रमाणेच करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि. पुणे) शहरात शासकीय दाखल्यांकरिता नागरिकांची होत असलेली आर्थिक लूट

**(८) * ३५४७० श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील शाळा महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेमुळे उत्पन्न, जात आणि आधिवास प्रमाणपत्रासाठी तसेच विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश पूर्व परीक्षेसाठी व म्हाडाच्या घरासाठी अर्ज भरण्याकरीता राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र आणि तात्पुरता रहिवासी प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांकरिता पिंपरी-चिंचवड शहरातील आपले सरकार, नागरी सुविधा व सेतू केंद्रांवर शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांची गर्दी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरामधील २०० महा-ई सेवा केंद्रामध्ये अनेक केंद्रावर शासनाने ठरवून दिलेल्या ५९ व १२८ रुपयांच्या शुल्कापेक्षा दाखल्यासाठी ६०० ते १५०० रुपये व जातीच्या दाखल्याकरिता दोन ते पाच हजार रुपये घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील आपले सरकार, महा-ई-सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र व सेतू केंद्रामध्ये शासनाने निश्चित केलेले शुल्काचे फलक जाणीवपूर्वक लावत नसल्याने सदर केंद्रचालकांकडून जादा पैसे घेऊन विद्यार्थी व नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने निश्चित केलेल्या दरातच महा-ई-सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र, सेतू केंद्र व आपले सरकार चालकांनी सेवा देणे बंधनकारक असतानाही प्रशासकीय नियंत्रणाच्या अभावामुळे केंद्र चालक शासकीय दाखल्यांसाठी नागरिकांची आर्थिक लूट करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह शासनाने दस्त दक्षता पथकामार्फत तपासणी करून केंद्र चालकांचे परवाने रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) पिंपरी चिंचवड शहरात शालेय विद्यार्थी यांना दहावी, बारावी परिक्षेनंतर महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियांसाठी उत्पन्न, जात प्रमाणपत्र तसेच म्हाडाच्या घरासाठी अर्ज भरण्याकरिता राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र आणि तात्पुरता रहिवासी प्रमाणपत्र इत्यादी करिता सेतू सुविधा केंद्र व तालुक्यातील अन्य १४६ कार्यरत महा ई सेवा केंद्रातून वितरित केले जाते.

महाऑनलाईन प्रणालीव्दारे नागरिक सेवा केंद्र (सेतू) निगडी व इतर १४६ कार्यरत महा ई सेवा केंद्राद्वारे दिनांक १ एप्रिल, २०२५ ते दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर उत्पन्न, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र वय अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल), आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असे एकुण ९३७४२ प्रमाणपत्र मंजूर करुन वितरित करण्यात आले आहेत. माहे एप्रिल,मे व जून, २०२६ मध्ये २०१७१ दाखले मंजूर करुन वितरित करण्यात आले आहेत.

तसेच पिंपरी चिंचवड मधील महा-ई-सेवा केंद्रामध्ये अनेक केंद्रावर शासनाने ठरवून दिलेल्या रु.५९ व रु.१२८ अधिकची रक्कम घेत असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) पिंपरी चिंचवड तहसिल कार्यालयामार्फत वेळोवेळी महा-ई-सेवा केंद्रांची तपासणी करण्यात येते. त्यानुषंगाने दिनांक ८ एप्रिल, २०२५ च्या आदेशान्वये मंडल निहाय महा-ई-सेवा केंद्रांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच दिनांक २० मे, २०२६ रोजी नायब तहसिलदार पिंपरी चिंचवड तहसिल कार्यालय व सर्व मंडल अधिकारी यांचे मार्फत महा-ई-सेवा केंद्रांची तपासणी करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी विभागातील पुणे व नागपूर येथील प्रयोगशाळांसाठी खरेदी करण्यात आलेल्या उपकरणात झालेला गैरव्यवहार

**(९) * ३९३९९ श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी विभागाच्या पुणे व नागपूर येथील प्रयोगशाळांसाठी आरकेव्हीवाय-डीपीआर योजनेतंर्गत खरेदी करण्यात आलेल्याउपकरणांमध्ये अंदाजे ८० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान शासनाला झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित उपकरण खरेदी प्रक्रियेमध्ये कृषी आयुक्तांची अंतिम मान्यता न घेता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे तसेच सरकारी जेम प्रणालीवरील लॉगइन व पासवर्डचा गैरवापर करून कंत्राट वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने ज्या कंपनीची उपकरणे कमी दरात खरेदी केली त्याच कंपनीची उपकरणे कृषी आयुक्तालयाने जास्त दराने खरेदी केली असून खरेदी केलेली काही उपकरणे अद्याप वापराविना पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह शासनाच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली करणे व भविष्यातअशा प्रकारचे गैरव्यवहार टाळण्यासाठी व पारदर्शक खरेदी प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) ,(२), (३) व (४) राष्ट्रीय कृषी विकास योजनेतर्गत DPR अंतर्गत राज्यातील किडनाशके उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा बळकटीकरणाच्या प्रस्तावास दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी पार पडलेल्या ३४ व्या SLSC मध्ये मंजुरी मिळाली. त्याबाबत शासन निर्णय दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ अन्वये रुपये १७९४.२८ लाख रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

प्रयोगशाळेस आवश्यक असलेली GCMS-MS (२ नग) या उपकरणांचे निविदा दिनांक २० ऑगस्ट,२०२५ रोजी Gem प्रणालीवर निविदा मागविण्यात आली.

GCMS-MS उपकरणाच्या खरेदीसाठी Gem प्रणालीद्वारे प्राप्त L१ ला दिनांक ४ सप्टेंबर, २०२५ रोजी तत्कालीन कृषी उपसंचालक (प्रयोगशाळा) यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे DSC वापरुन दिल्याचे दिसून येते.

तांत्रिक मुल्यमापन केल्यानंतर निविदा उघडणे व त्यानुसार प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता करून L१ निविदा धारकास निविदा समितीची मंजुरी घेणे आवश्यक असताना, या प्रक्रियेचे पालन न करता पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येतात.

दिनांक ४ सप्टेंबर,२०२५ रोजी पुरवठा आदेश दिल्यानंतर आयुक्त, कृषी यांची मान्यता घेण्याचे दृष्टीने तांत्रिक समितीची सभा दिनांक ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी व आर्थिक निविदा समितीची सभा दिनांक १४ ऑक्टोबर,२०२५ रोजी घेण्यात येऊन मा. आयुक्त कृषी यांचेकडे L.१ निविदा धारकास मान्यता घेण्यासाठी नस्ती दिनांक १४ ऑक्टोबर,२०२५ रोजीच्या टिपणीन्वये सादर करण्यात आली. परंतु L१ निविदा धारकास आयुक्त (कृषी) यांनी मान्यता दिलेली नाही.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेतर्गत कीडनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा बळकटीकरणासाठी आवश्यक उपकरणांची खरेदीसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेनुसार L१ पुरवठा धारकास आयुक्त (कृषी) यांची मान्यता न घेता परस्पर दोन नग GCMS-MS या उपकरणाची रक्कम रु.४,८५,०९,२१४/- रकमेचे पुरवठा आदेश दिनांक४ सप्टेंबर,२०२५ रोजी online Gem प्रणालीद्वारे देण्यात आले. त्यानुसार सदरच्या उपकरणांचा पुरवठा पुणे व नागपूर येथील प्रयोगशाळामध्ये करण्यात आलेला आहे व सद्दस्थितीत ही उपकरणे विनावापर आहेत. तथापि, सदर देयकांची रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

प्रयोगशाळा स्तरावर खरेदी करण्यात आलेल्या उपकरणाची किंमत प्रति नग रक्कम रु.२,४२,५४,७०७/- असून कृषि विद्यापीठ, परभणी यांनी खरेदी केलेल्या GCMS-MS या उपकरणाची खरेदी रक्कम रुपये १,९७,३०,२४७/- इतकी आहे. प्रयोगशाळा उपकरणे खरेदीतील अनियमिततेबाबत आयुक्त (कृषि) यांनी दक्षता पथकामार्फत तपासणी केली असून सदर प्रकरणी जबाबदार संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे.

भविष्यात अशा प्रकारचे गैरव्यवहार टाळून पारदर्शक खरेदी प्रक्रियेबाबत खबरदारी घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी व धाराशिव जिल्ह्यांसाठी खताची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून वाढीव आवंटन मंजूर करण्याबाबत

**(१०) * ४०१२९ श्री.शेखर निकम (चिपळूण), डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागात खरीप हंगामात भात व नाचणी ही मुख्य पिके घेतली जात असून भात व नाचणी पिकांची पेरणी पावसापूर्वी धुळवाफ पद्धतीने केली जाते व माहे मे, महिन्यात रोपवाटिका तयार करून माहे जून, महिन्यात पुनर्लागवड केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामासाठी युरिया खताची मागणी मुख्यत्वे तालुका खरेदी-विक्री संघामार्फत करण्यात येते व विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांमार्फत त्याचे वितरण केले जात असून युरिया खताचा पुरवठा एकाच वेळी न करता टप्प्याटप्प्याने केला जात असून अनेकदा जून महिन्यानंतर पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागिल खरीप हंगामात युरिया खताचा पुरवठा वेळेत न झाल्यामुळे भात पुनर्लागवडीच्या कालावधीत खत टंचाई निर्माण झाली व त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकणातील भौगोलिक परिस्थिती डोंगराळ असल्याने शेतकरी पावसाळयापूर्वीच खत साठवूण ठेवतात त्यामुळे टप्प्याटप्प्याने खतपुरवठा झाल्यास वाहतूक खर्च वाढून शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खरीप हंगाम सन २०२६ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यास कृषी आयुक्तालयामार्फत ६६०० मे. टन युरिया खत आवंटन मंजूर करण्यात आले असून गत वर्षाच्या तुलनेत सुमारे ४०० मे. टनांनी कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, धाराशिव जिल्हयात खरीप हंगाम सन २०२६ मध्ये शेतक-यांची १५ हजार ९२३ मे.टन एवढी खताची मागणी असून उपलब्ध साठा फक्त ६ हजार २२७ मे.टन आहे प्रत्यक्ष साठा आणि शेतक-यांची मागणी यातील मोठी तफावत असल्याचे दिनांक ३१ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यात युरिया खताची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी ५०० मे. टन वाढीव आवंटन मंजूर करून संपूर्ण आवंटन व रेक १५ मे, पूर्वी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच धाराशिव जिल्हयात खरीप हंगाम सन २०२६ साठी डीएपी खताचा साठा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.
(२) युरिया खताचा केंद्र शासनाकडून महिनानिहाय मंजूर नियोजनाप्रमाणे पुरवठा केला जातो. त्यानुसार राज्यातील जिल्हयांमध्ये मंजूर नियोजनाप्रमाणे युरिया खताचा पुरवठा केला जातो.
(३) हे खरे नाही.

मागील वर्षी खरीप हंगाम सन २०२५ मध्ये राज्यासाठी युरिया खताचे एकूण १५.५२ लाख मे. टन आवंटन मंजूर असून हंगामामध्ये १२.७४ लाख मे. टन युरियाचा पुरवठा (८२%) झाला होता. राज्याचा पुरवठा कमी असतानाही खरीप हंगाम २०२५ मध्ये रत्नागिरी जिल्हयासाठी ६९८४ मे. टन मंजूर युरिया असताना ७२७६ मे. टन युरियाचा पुरवठा (१०४%) करण्यात आला. मंजूर आवंटनापेक्षाही ४% जास्त पुरवठा करण्यात आला आहे.
(४) केंद्र शासनाकडून महिनानिहाय मंजूर नियोजनाप्रमाणे खताचा पुरवठा केला जातो. त्यानुसार राज्यातील जिल्हयांमध्ये मंजूर नियोजनाप्रमाणे खताचा पुरवठा केला जातो.
(५) हे खरे आहे.
(६) हे खरे नाही.

धाराशिव जिल्हयाकरिता खरीप हंगाम २०२६ साठी एकूण ९५६०० मे. टन खताचे आवंटन मंजूर केले असून १ एप्रिल 2026 रोजीचा उपलब्ध खत साठा ६४४८७ मे. टन आहे. १ एप्रिल २०२६ पासून ३४६७३ .मे टन रासायनिक खतांचा पुरवठा झालेला असून एकूण उपलब्ध खत साठा ९९१६० मे. टन इतका आहे.
(७) कृषी विकास अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रत्नागिरी यांनी खत उत्पादक व पुरवठादार कंपन्यांना खत पुरवठा करणेबाबत पत्रव्यवहार केला आहे. रत्नागिरी जिल्हयासाठी माहे जुन २०२६ अखेर ३०३६ मे. टन युरिया मंजूर होता मात्र १७ जुन पर्यत ४१८३ मे. टन युरियाचा पुरवठा (१३८ %) करण्यात आला आहे. तसेच राज्य शासनाकडून खरीप हंगाम २०२६ मध्ये रत्नागिरी जिल्हयामध्ये ६२९.९१ मे. टन युरिया खत साठा संरक्षित करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्हयात खरीप हंगाम २०२६ साठी डीएपी खताचे १ एप्रिल २०२६ रोजी ९३५९ मे. टन खत साठा शिल्लक होता. तसेच माहे जुन २०२६ अखेर ९७९२ मे. टन मंजूर खतापैकी १७ जुन पर्यत ३३६८ मे.टन डीएपी खताचा पुरवठा झालेला आहे, असे एकूण १२७२७ मे. टन डीएपी खत धाराशिव जिल्हयासाठी उपलब्ध झाले आहे. तसेच राज्य शासनाकडून खरीप हंगाम २०२६मध्ये धाराशिव जिल्हयामध्ये २१२३.३७ मे. टन युरिया व ७३० मे. टन डीएपी खत साठा संरक्षित करण्यात आला आहे.

कृषि आयुक्तालयामार्फत रत्नागिरी व धाराशिव जिल्हयात मंजूर नियोजनाप्रमाणे नियमितपणे खत पुरवठा होणेसाठी नियोजन व सनियंत्रण करण्यात येत आहे.

----------------

## कल्याण-मुरबाड रेल्वे प्रकल्पास कल्याण मानिवली गावातील बागायती शेतकऱ्यांनी केलेला विरोध

**(११) * ३६५८० श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-मुरबाड रेल्वे प्रकल्पात कल्याण ग्रामीणमधील मानिवली गावातील बागायती शेतकरी यांची शेतजमीन आणि घरे बाधित होतअसल्याने त्यांनी सदर प्रकल्प अन्य मार्गाने वळविला गेला नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावातील शेतक-यांनी उक्त प्रकल्पाच्या सर्वेक्षणाला विरोध करुन काळे झेंडे दाखवून निषेध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त रेल्वे मार्ग अन्य मार्गाने वळविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) कल्याण-मुरबाड या रेल्वे प्रकल्पासाठी मानिवली गावातील जमिनी संपादीत करण्यात येत आहेत. सदर रेल्वे मार्ग अन्य मार्गाने नेण्याच्या मागणीच्या अनुषंगाने मोजणीस होत असलेला विरोध व त्याबाबत प्राप्त झालेले निवेदन मध्ये रेल्वे या भूसंपादन संस्थेकडे पाठविण्यात आले आहे. दरम्यानच्या कालावधीत मानिवली गावातील ४१ शेतकऱ्यांनी सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील व व्यवसाय करण्यास सुलभता होईल यास्तव प्रकल्पास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे जिल्हा प्रशासनास कळविले आहे. सद्यस्थितीत उप विभागीय अधिकारी व भूसंपादन अधिकारी, कल्याण यांच्या कार्यालयामार्फत अंतिम अधिसुचना पारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री पीक विमा योजनातंर्गत नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(१२) * ३३२०७ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे सुमारे ९८लाख ४३ हजार ८२३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून पहिल्या टप्प्यात सुमारे १,२१९ कोटी रुपयांची नुकसानभरपाई वितरित करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरपाईपैकी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केवळ सुमारे १९४.७० लाख रुपये इतकी तर इतर जिल्हयांच्या तुलनेने अत्यल्प नुकसानभरपाई देण्यात आलीआहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नुकसानभरपाईचे वितरण पीक कापणी प्रयोगांच्या आधारे करण्यात आले असून, नागपूर जिल्ह्यातील प्रत्यक्ष नुकसान व मिळालेली भरपाई यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सन २०२५ च्या खरीप हंगामात आतापर्यंत राज्यात एकूण रु.१५७७.४९ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली आहे.

त्यापैकी रु.१५२३.५० कोटी इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा करण्यात आली असून, उर्वरित नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) व (३) नाही,

नागपूर जिल्ह्यात खरीप सन २०२५-२६ या हंगामात आतापर्यंत रु.७४४.३७ लक्ष इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली आहे. त्यापैकी रु.७३७.३५लक्ष इतकी नुकसान भरपाई संबंधित पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. तर, उर्वरित रु.७.०१ लक्ष इतक्या नुकसान भरपाईचे वाटप प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ पुसद वन विभागातंर्गत येणाऱ्या बेलगव्हाण व नागवाडी नियत क्षेत्रात वृक्ष प्रत्यारोपणात झालेला गैरव्यवहार

**(१३)** * **३२७८७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ पुसद वन विभागातंर्गत येणाऱ्या पुसद वर्तुळातील बेलगव्हाण व शिळोणा वर्तुळातील नागवाडी नियत क्षेत्रातील २५२ वृक्षांच्या प्रत्यारोपणावर एक कोटी ७८ लाख २१ हजार ५४३ रुपयांचा निधी खर्च करण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष प्रत्यारोपणाचे तातडीने अंदाजपत्रक बनवून त्याच दिवशी तांत्रिक मंजुरी घेऊन प्रशासकीय मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आले असून तांत्रिक मंजुरी पत्र व अंदाजपत्रकाची तपासणी न करता प्रस्ताव अपर मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी तो प्रस्ताव आवक-जावक कक्षाला परत केल्यामुळे सदर अंदाजपत्रक संशयास्पद असून त्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता होती किंवा नाही याची चौकशी करण्याची मागणी मा.सचिव वने यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रशासकीय मान्यता नसताना व एकही वृक्ष जिवंत नसताना शासनाच्या कोट्यवधी रुपयाची उधळपट्टी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) यवतमाळ पुसद वन विभागांतर्गत बेलगव्हाण, शिरवळ व नागवडे नियत क्षेत्रांमध्ये २५२ वृक्षांच्या प्रत्यारोपणाचे काम झालेले नाही. शेंबाळपिंपरी वनपरिक्षेत्रात शिळोणा परिमंडाळातील शिळोणा व नागवाडी या नियतक्षेत्रात एकुण २१४ वृक्षांच्या प्रत्यारोपणाची कामे सन २०२४-२५ मध्ये झालेली असून सदर कामाकरीता रु.७६,८१,११३/- एवढा निधी खर्च झाला आहे.

(२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांच्या अहवालानुसार सदर कामाकरीता नमुना अंदाजपत्रक उपलब्ध नसल्याने उपवनसंरक्षक पुसद यांनी वृक्ष प्रत्यारोपणाचे अंदाजपत्रक बनवून दिनांक ०६.०९.२०२४ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान करुन दिनांक ११.०९.२०२४ च्या पत्रान्वये प्रशासकीय मंजुरीसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) यवतमाळ यांना प्रस्ताव सादर केल्याचे तसेच मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) यवतमाळ यांनी दिनांक १२.०९.२०२४ च्या पत्रान्वये उक्त प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या मान्यतेस्तव सादर केल्याचे नमूद आहे. तथापि, सदर प्रकल्पाबाबत केंद्र शासन स्तरावरून प्रगती

बाबतचा वारंवार आढावा चालू असल्याने कामाची निकड लक्षात घेता उपवनसंरक्षक पुसद यांनी सदर कामे ही उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दिनांक ०७.०५.२०२१ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दिनांक २०.०५.२०२१ नुसार वनविभागाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे कार्यवाही केल्याचे कळविले आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी श्री. गजानन वानखडे रा.सुकळी यांनी मा. अपर मुख्य सचिव (वने) यांचेकडे चौकशी करण्याची मागणी केली आहे.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांच्या अहवालानुसार सदर कामाचे नमुना अंदाजपत्रक उपलब्ध नसल्याने प्रशासकीय मान्यता मिळणेस अडचण निर्माण झाली होती. कामाची निकड लक्षात घेता उपवनसंरक्षक पुसद यांनी सदर कामे ही उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दिनांक ०७.०५.२०२१ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दिनांक २०.०५.२०२१ नुसार वनविभागाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

तसेच सदर प्रकरणी पुसद वनविभागांर्तगत एकूण ५ ठिकाणी (शिळोणा, रोहणा, नागवाडी, धुंदी व जवाहर नगर) ११७६ रोपांचे प्रत्यारोपण झालेले आहे. सदर ठिकाणी जिवंत रोपांची संख्या ८२८ असून जिवंत रोपांची टक्केवारी ७०.४१ % आहे.

तथापि, या प्रकरणी प्राप्त निधी व त्यानुसार झाडे प्रत्यारोपणाची केलेली कार्यवाही या अनुषंगाने दस्ताऐवज व निधी वितरणासंबंधी तपासणी करण्यासाठी विशेष लेखापरीक्षण पथकामार्फत चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

तसेच, प्रत्यारोपन केलेल्या क्षेत्राची मौका तपासणी करणेकरिता विभागीय वन अधिकारी दक्षता यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली असून सदर समित्यांची कार्यवाही चालू आहे. उपरोक्त दोन्ही समित्यांचा अहवाल तातडीने सादर करण्याबाबत शासनाच्या दिनांक २५.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. उक्त अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि. ठाणे ) तालुक्यातील शबरी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१४) * ३४९०८ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुका हा पूर्णत:पेसा क्षेत्र असून या भागात राज्य शासनाच्या शबरी घरकुल योजनेस गत दोन वर्षापासून निधी उपलब्ध न झाल्याने सुमारे ६०० हून अधिक आदिवासी लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित असल्याचे दिनांक ९ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी अभावी अनेकांची घरे अर्धवट अवस्थेत असून अवकाळी पाऊसामुळे अनेक आदिवासी कुटूंबे बेघर झाली आहेत, तसेच नवा इष्टांक प्राप्त न झाल्याने गत दोन वर्षांपासून नवीन घरकुलांना मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहापूर तालुका हा पूर्णतः पेसाक्षेत्र म्हणून घोषित असून डोंगरदऱ्या, जंगल आणि दुर्गम वाड्याने व्यापलेला असतानाही या तालुक्यातील शबरी घरकुल योजनेतील काही लाभार्थ्यांचे बांधकाम पूर्ण होऊनही हप्ते न मिळाल्यामुळे त्यांना खाजगी सावकारी संस्थेकडून कर्ज काढण्याची नामुष्की लाभार्थ्यांवर आल्यामुळे त्यांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागत आहे, हे ही खरेआहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून शबरी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाई करणा-या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करून ज्यांचे हप्ते प्रलंबित आहेत त्यांना निधी वितरीत करून नवीन इष्टांक देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) हे खरे नाही.

शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत मंजुर झालेल्या सर्व घरकुलांसाठी निधी उपलब्ध असुन बांधकामाच्या प्रगतीनुसार PFMS प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्याच्या खात्यात अनुदान वितरीत करण्यात येत आहे.
(२) शबरी आदिवासी घरकुल योजने अंतर्गत निधीची अडचण नाही.तथापी, ग्राम विकास विभागाच्या दिनांक ४ एप्रिल,२०२५रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी राज्यातील, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचेकडून विविध प्रवर्गाकरीता राबविण्यात येणाऱ्या राज्यपुरस्कृत घरकुल योजनांचा (शबरी आदिवासी घरकुल योजना सहित) लक्षांक प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत देण्यात येणार असुन शबरी आदिवासी घरकुल (ग्रामीण) योजनेंतर्गत स्वतंत्रपणे नव्याने वेगळे उद्दिष्ट देण्यात येणार नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय आश्रम शाळांमधील अपुऱ्या प्रवेश क्षमतेमुळे आदिवासी विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत असल्याबाबत

**(१५) * ३७०३९ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सर्व शासकीय आश्रम शाळांमध्ये इयत्ता पाचवी, सहावी आणि नववीच्या वर्गाची प्रवेश क्षमता पूर्ण झाली असल्याने अनेक आदिवासी विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ मध्ये प्रवेश क्षमतेची मर्यादा पूर्ण झाल्याने अनेक पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकला नाही तसेच जिल्हा परिषद शाळांमधून उत्तीर्ण झालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना जागेअभावी शिक्षणापासून दूर राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून ठेवण्यासाठी पाचवी, सहावी आणि नववीसाठी अतिरिक्त तुकड्या वाढविण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) व (२) नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू अंतर्गत ३४ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. शासकीय आश्रमशाळेत प्रवेशासाठी प्राप्त अर्जानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले असून जिल्हा परिषद शाळांमधून उत्तीर्ण झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देण्यात आले आहेत. डहाणू प्रकल्पांतर्गत सद्यस्थितीत १८४४० विद्यार्थी प्रवेशित आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान आदिवासी विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेले नाहीत.

(३) आदिवासी विकास विभागाने दिनांक ११ जुन, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून डहाणू प्रकल्पातील ४ प्राथमिक आश्रमशाळांना माध्यमिक साठी (इ. ८वी ते १०वी) व २ माध्यमिक आश्रमशाळांना उच्च माध्यमिक साठी (इ.११वी व इ.१२वी) श्रेणीवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पश्चिम आशियातील युद्धामुळे राज्यात खतांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत**

**(१६) * ३७३४५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात खतांचा तुटवडा निर्माण झाला असून राज्याला ४८.८० लाख मेट्रिक टन खतांचा पुरवठा मंजूर झाला असून माहे एप्रिल मध्ये राज्यात केवळ २७ लाख ४४ हजार टन साठा उपलब्ध असून ४४% खतांचा पुरवठा कमी असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याला खरीप हंगाम २०२६ साठी युरियाची १५.८० लाख टन गरज असून उपलब्धता मात्र ३८ टक्के आहे, डीएपीची ५ लाख टन गरज असून उपलब्धता ४७ टक्के इतकी असल्याचे माहे एप्रिल २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय

(३) तसेच पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यास खरीप हंगामासाठी सुमारे ६३ हजार ३५६ मे.टन रासायनिक खतांची आवश्यकता असताना केवळ ४० हजार ९७८ मे.टन खतांना मंजुरी देण्यात आली असून सुमारे २२ हजार मे.टन खतांचा तुटवडा निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यासह पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यास खरीप हंगामात वापरण्यात येणाऱ्या रसायनिक खताचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) केंद्र शासनाकडून पूर्ण खरीप हंगामासाठी ४८.८० लाख मे टन खत मंजूर असून एप्रिल ते सप्टेंबर अखेर महिनानिहाय नियोजन करुन त्याप्रमाणे पुरवठा केला जातो.

दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी राज्यात एकूण २९ .५६ लाख मे टन खत साठा उपलब्ध होता. जो एकूण खरीप हंगाम २०२६ च्या मंजूर आवंटनाच्या ६१ टक्के इतका होता. तथापि १७ जून २०२६ रोजी एकूण उपलब्धता ८४ टक्के आहे.

(२) राज्याला खरीप हंगाम २०२६ साठी युरियाचे मंजूर आवंटन १५ .८० लाख मे टन असून दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी युरियाची एकूण उपलब्धता ४१ टक्के होती तर डीएपीचे मंजूर आवंटन ५ लाख मे टन असताना एकूण उपलब्धता ४९ टक्के होती. तथापि दिनांक १७ जुन रोजी ही उपलब्धता अनुक्रमे ६६ टक्के व ६१ टक्के इतकी झाली आहे.

(३) हे खरे नाही.

पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये मागील पाच वर्षाचा खरीप हंगामातील सरासरी खत वापर ३८२२४ में टन असून खरीप २०२६ साठी ४०९७८ मे टन खत साठा मंजूर आहे. सरासरी वापरोपक्षा मंजूर खत नियोजन जास्त आहे. पैठण तालुक्यासाठी १ एप्रिल २०२६ रोजी शिल्लक खत साठा १७६६० में टन होता व १ एप्रिल २०२६ते १७ जून २०२६ पर्यंत १२३४७ में टन पुरवठा होऊन एकूण ३०००७में टन (७३ टक्के) खत साठा उपलब्ध झाला आहे.

(४) खरीप हंगामासाठी राज्यास ४८.८०लाख मे टन खतांचे आवंटन मंजूर असून १ एप्रिल चा शिल्लक साठा २५ .५३लाख में टन व १७ जुन २०२६ अखेरचा पुरवठा १५ .२८ लाख मे टन असून एकूण ४०.८१लाख मे टन रासायनिक खत उपलब्ध झाले आहे. केंद्राकडून राज्यासाठी महिनानिहाय खतांचे नियोजन उपलब्ध होत असते. त्याप्रमाणे राज्य स्तरावरुन जिल्हानिहाय नियोजन करुन ते जिल्हयांना व खत पुरवठादार कंपन्यांना कळविले जाते.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व कृषी विकास अधिकारी स्तरावरुन त्यांना प्राप्त जिल्हानिहाय नियोजनाचे तालुका स्तरावर नियोजन केले जाते. मंजूर आवंटन, झालेला पुरवठा व जिल्हा तसेच तालुक्यातील मागणीप्रमाणे उपलब्ध खतांचा योग्य रीतीने पुरवठा व्हावा यासाठी कृषि आयुक्तालयाकडून नियमित नियोजन व सनियंत्रण करण्यात येते.

ऐन खरीप हंगाम २०२६ मध्ये मागणीच्या वेळी युरिया व डीएपी खतांचा तुटवडा भासू नये म्हणून राज्यात युरिया १४१३८० मे टन व डीएपी १८६८४ में टन खताचा संरक्षित साठा केला आहे. छ. संभाजीनगर जिल्हयामध्ये युरिया १०३८०.८०में टन व डीएपी ७२० में टन खताचा संरक्षित साठा केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिलमधील स्मारकाचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत

**(१७) * ३५४९४ श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील इंदू मिलमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकांतर्गत उभारण्यात येणाऱ्या पुतळ्याचे काम ब्राँझ धातूच्या वाढलेल्या दरामुळे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये ब्राँझचा दर ८ रुपये प्रति इंच असताना पुतळ्याचे काम हाती घेण्यात आले होते मात्र आता हा दर १७ रुपयांवर पोहोचल्याने स्मारक निर्मितीच्या खर्चात मोठी वाढ झाली असून शासकीय निधीच्या नियोजनात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कच्च्या मालाच्या दरवाढीमुळे पुतळ्याचे काम प्रलंबित असल्याने स्मारकाच्या मूळ नियोजित कालमर्यादेचे उल्लंघन होण्याची व काम लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त दरातील तफावत दूर करून निधी वेळेत उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) अंशत: खरे आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या बांधकामाचे कंत्राट मे. शापूरजी पालनजी कंपनीला एक रक्कमी पध्दतीने देण्यात आले आहे.

मे. शापुरजी पालनजी कंपनीने नामवंत शिल्पकार राम सुतार फाईन आर्टस यांना पुतळयाच्या बाहेरील कांस्य धातुच्या आवरणाचे कामाकरीता उपकंत्राटदार म्हणुन नियुक्त केले आहे.

सदर पुतळयाचे काम अत्यंत विशेष तांत्रिक स्वरूपाचे आहे. कामाच्या अंमलबजावणीदरम्यान कांस्य धातू व त्यावरील प्रक्रिया खर्चामध्ये आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनपेक्षित परिस्थितीमुळे लक्षणीय वाढ झाल्याचे संबंधित कंत्राटदार व उपकंत्राटदाराने माहे एप्रिल २०२६ मध्ये निदर्शनास आणून दिले. याअनुषंगाने सविस्तर प्रस्ताव मे. शापुरजी पालनजी कंपनीने प्राधिकरणास अद्याप सादर केलेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१८ मध्ये मुळ कंत्राटामध्ये पुतळयाची उंची ३५० फुट (पुतळा २५० फुट व चौथारा १०० फुट) समाविष्ट होती. तद्नंतर, नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक१०.०९.२०२० अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे इंदू मिल येथील भव्य स्मारकाच्या सुधारीत संकल्पनेनुसार बांधकाम करावयाच्या प्रकल्पातील पुतळयाची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंच अशी एकूण १३६.६८ मीटर (४५० फूट) उंची ठेवण्यास मान्यता देण्यात आली. तसेच, दिनांक ०६.०४.२०२३ रोजी गाझीयाबाद येथील शिल्पशाळेला मान्यवरांनी भेट देऊन पुतळयाच्या प्रतिकृतीस दर्शविलेल्या सहमतीस अनुसरुन इंदु मिल येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकात उभारण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ३५० फुट पुतळयासाठी श्री.राम सुतार यांच्या शिल्पशाळेतील २५ फुटाच्या प्रतिकृतीच्या पुतळयाच्या धर्तीवर ३५० फुटी पुतळा तयार करण्यास विभागाच्या शासन निर्णय दिनांक१०.०८.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मे.शापुरजी पालनजी कं. व राम सुतार यांच्यातील करारानुसार कांस्य धातुची किंमत रू.८५० प्रति किलोप्रमाणे देण्यात आली आहे व सद्यस्थितीत कांस्य धातुची किंमत रू.१५०० ते १७०० प्रति किलो झाल्याचे कंत्राटदाराकडून कळविण्यात आलेले आहे.

मुळ कराराच्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदारास खरेदी केलेल्या साहित्य व कामासाठी भाववाढ देण्यात येते.

संबंधित कंत्राटदार व उपकंत्राटदाराने माहे एप्रिल २०२६ मध्ये कांस्य धातु व त्यावरील प्रक्रिया या दोन्ही बाबींकरीता सद्यपरिस्थितीप्रमाणे वाढीव दराची मागणी केली आहे. परंतू, याबाबत कंत्राटदाराकडून सविस्तर प्रस्ताव अद्याप देण्यात आलेला नाही. सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प सल्लागार व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून छाननी करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सुधारीत संकल्पनेनुसार इंदू मिल येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाच्या प्रकल्पाच्या खर्च रू. १०८९.९५ कोटी इअत्क्या खर्चास मान्यता देण्यात आली असून; आतापर्यंत सदर प्रकल्पास रू.७४८ कोटी इतका निधी शासनाकडून मुंबई विकास प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) या कार्यान्वयीन यंत्रणेस उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपरोक्त स्मारकाच्या पुतळयाचे काम हे अत्यंत विशेष तांत्रिक स्वरूपाचे असून; त्यामध्ये डिझाईन, कास्टिंग, फॅब्रिकेशन व फिनिशिंग या प्रक्रियांचा समावेश आहे. कामाच्या अंमलबजावणीदरम्यान आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनपेक्षित परिस्थितीमुळे कांस्य धातू व प्रक्रिया खर्चामध्ये असामान्य वाढ झाल्याचे संबंधित कंत्राटदाराने मुंबई विकास प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) या कार्यान्वयीन यंत्रणेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

कंत्राटदारामार्फत कांस्य धातू व प्रक्रिया खर्चातील असामान्य वाढीबाबत सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मुंबई विकास प्रदेश विकास प्राधिकरणाकडून व तसेच संबंधित सर्व भागधारकांच्या समन्वयाने छाननी करण्यात येईल. तसेच, सदर वाढ ही मुळ कंत्राटातील नियमित किंमत समायोजन (Price Escalation) तरतुदींच्या

पलीकडील आहे. त्यामुळे मुंबई विकास प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अहवाल प्राप्त होताच शासनाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून कृषी साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१८) * ३३०३१ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील 'जिल्हा खनिज प्रतिष्ठान' (DMF) अंतर्गत शेतकरी कल्याणाच्या नावाने कृषी विभागाने प्रशासनाकडे सादर केलेले २० कोटी रुपयांचे मागणीपत्र बनावट असल्याचे आणि त्यावरील स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एटापल्ली तालुक्यातील 'जीवनगट्टा' येथील जनबंधू शेतकरी उत्पादक कंपनीच्या नावाने मोहफूल संकलन जाळी, सौर ऊर्जा कुंपण आणि जैविक कीडरोग व्यवस्थापन कृषी अवजारे खरेदीसाठी सदर निधीची मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी प्रशासनाकडे अशा कोणत्याही निधीची मागणी केली नाही आणि मागणीपत्रावरील स्वाक्षऱ्या त्यांच्या नसल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यापूर्वीही गरज नसताना याच निधीतून ७.८० कोटी रुपयांचे सौर कुंपण आणि इतर साहित्य खरेदीत झालेला आर्थिक गैरव्यवहाराची दखल घेऊन जिल्ह्याचे सहपालकमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बनावट स्वाक्षऱ्यांद्वारे शासनाची फसवणूक करणाऱ्या कृषी विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.
(२) 'जिल्हा खनिज प्रतिष्ठान' निधी अंतर्गत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे मोहफूल संकलन जाळी, सौर ऊर्जा कुंपण व कृषि औजारे या घटकांच्या अनुदानासाठी प्रस्ताव सादर केला आहे. मात्र, सदर मागणी कोणत्याही विशिष्ट कंपनीच्या नावाने केलेली नाही.
(३) संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी बनावट अनुदान मागणी पत्राबाबत पत्रव्यवहार केलेला नाही. तथापि, मा.विधानसभा सदस्य, अहेरी यांचे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे विविध मंजूर कामांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचे पत्र प्राप्त झाले आहे.
(४) हे खरे नाही. यापूर्वी जिल्हा खनिज प्रतिष्ठान योजनेतुन सौर कुंपण योजनेसाठी प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून रुपये १ कोटी ९८ लाख थेट लाभ हस्तांतरण तत्त्वावर गट व कंपन्यांच्या बँक खात्यात अनुदान स्वरुपात अदा केले आहेत. सदर प्रकरणी आर्थिक गैरव्यवहार झालेला नसून मा. सहपालकमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिलेले नाहीत.
(५) लागू नाही.
(६) लागू नाही.

-----------------

## मुल (जि.चंद्रपूर) येथे स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(१९) * ३२३९६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुल (जि.चंद्रपूर) येथे स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत असून कृषी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आवश्यक सर्व अनुकूल बाबी मुल तालुक्यात उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती व नागपूर विभागातील पीकपद्धती, हवामान, मृदाप्रकार व कृषी संशोधनाच्या गरजा वेगवेगळया असल्याने पूर्व विदर्भासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी विधानसभेत मा. कृषिमंत्र्यांनी या मागणीचा अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्याच्या दिलेल्या आश्वासनामुळे समिती नेमण्यात आली आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पूर्व विदर्भातील धान उत्पादक क्षेत्राचा विचार करता अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथे स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन केल्यास शेतकऱ्यांना स्थानिक पिकांवर संशोधन, तंत्रज्ञान, प्रशिक्षण व कृषी नवकल्पनांचा थेट लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मुल (जि.चंद्रपूर) येथे स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथे स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असल्याची बाब खरी आहे.

(२), (३), (४) व (५) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या विद्यापीठाचे विभाजन करुन स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करण्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी सन २०१३ मध्ये माजी अध्यक्ष, नाबार्ड यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती व तद्नंतर सन २०१५ मध्ये तत्कालीन कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने, चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही अथवा मूल, येथे कृषि विद्यापीठ स्थापन करण्यास अनुकुलता दर्शविली होती. तथापि, तत्कालीन परिस्थितीत त्याबाबतचा निर्णय झाला नाही.

पूर्व विदर्भातील कृषि शिक्षणाची गरज,पूर्व विदर्भाचा विकास, स्थानिक पिकांवर संशोधन, कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच, वरोरा येथे विद्यापीठाशी संलग्न असलेले अनुदानित कृषि महाविद्यालय कार्यरतआहे. याशिवाय, चंद्रपूर जिल्ह्यातील एकार्जुना येथे “उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र” स्थापन करण्यात आले आहे. या कृषि महाविद्यालये/संशोधन केंद्राच्या माध्यमातून कृषि विषयक उच्च शिक्षणाचा लाभ चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना होतो.तसेच,कृषि विषयक संशोधन देखील केले जाते.

सद्यस्थितीत, राज्यात कार्यरत असलेल्या कृषि व कृषि संलग्न महाविद्यालयांचे तसेच, संशोधन केंद्राचे शासनावर असलेले लक्षणीय दायित्व विचारात घेता,हे दायित्व कमी होईपर्यंत नवीन महाविद्यालये/संशोधन केंद्रे स्थापन न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे राज्यातील मच्छीमार बांधवांनी सवलतीच्या दरात डिझेल पुरवठा व विशेष पॅकेजची केलेली मागणी

**(२०) * ३२५२१ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम राज्याच्या किनारपट्टीवरील मासेमारी व्यवसायावर झाला असून इंधनाच्या दरातील प्रचंड वाढ आणि तुटवड्यामुळे हजारो मच्छीमार बांधवांना माहे मार्च, २०२६ पासून बोटी बंदरातच उभ्या कराव्या लागल्यामुळे लाखो मच्छीमारांवर बेरोजगारी आणि उपासमारीचे संकट ओढवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिस्थितीमुळे मच्छीमार बांधवांनी शासनाकडे सवलतीच्या दरात डिझेल पुरवठा करण्याची व विशेष पॅकेजची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे अशंत खरे आहे.

आखाती देशातील युध्दजन्य परिस्थितीमुळे राज्यातील डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. त्याचा मासेमारी व्यवसायावर परिणाम झाला असून मत्स्य व्यवसायिकांना वाढलेल्या दराप्रमाणे डिझेल घ्यावे लागत आहे.

(२) होय

(३) राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थाना पुरवठा करण्यात येणारा डिझेल हा घाऊक दर (bulk rates) या प्रवर्गातून करण्यात येत आहे. जागतिक कच्च्या तेलाच्या चढउतारामुळे डिझेलच्या दरात वाढ झालेली आहे. त्यामुळे राज्यातील मच्छिमारांना आवश्यक असलेले डिझेल हे किरकोळ दर या प्रवर्गातुन पुरवठा होण्याबाबत शासनाने दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये मा. केंद्रिय मंत्री, पदुम, भारत सरकार यांना कळविलेले आहे. सदरची बाब ही केंद्र शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील उपवनसंरक्षक आणि परिक्षेत्र वन अधिकारी यांनी संगनमताने 'कॅम्पा' निधीमध्ये केलेला अपहार

**(२१) * ३४२९९ श्री.किसन वानखेडे (उमरखेड), श्री.संजय देरकर (वणी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ वनवृत्तांतर्गत जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ तसेच 'कॅम्पा' अंतर्गत प्राप्त झालेल्या निधी मध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी (यवतमाळ/वाशीम) यांनी मुख्य वनसंरक्षक, यवतमाळ वनवृत्त यांना दिनांक ४ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान लेखी तक्रार करून सखोल चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय कामकाजात ई-निविदा प्रक्रिया बंधनकारक असताना संबंधित वन अधिकाऱ्यांनी शासन नियमांचे उल्लंघन करून जाणीवपूर्वक ऑफलाइन निविदा प्रक्रिया राबवून काही मर्जीतील कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांची कामे बहाल करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित निविदा प्रक्रियेत सादर करण्यात आलेल्या डिमांड ड्राफ्ट आणि कंत्राटदारांच्या नावांमध्ये गंभीर विसंगती आढळून आल्याने निविदा प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुसद वन विभागांतर्गत बेलगव्हाण, शिरवळ व नागवडे नियत क्षेत्रांमध्ये २५२ वृक्षांच्या प्रत्यारोपणासाठी रुपये १ कोटी ७८ लाख २१ हजार ५४३ इतका निधी खर्च दाखविण्यात आला असून प्रत्यक्षात वृक्षांच्या अस्तित्वाबाबत व प्रकल्पाच्या गुणवत्तेबाबत शंका व्यक्त करण्यात आली असून रेल्वे प्रकल्प आणि वनसंवर्धनासाठी प्राप्त झालेल्या ५ कोटींच्या निधीचा विनियोग करताना संबंधित अधिकाऱ्यांनी स्वेच्छेनुसार निधी वळविल्याने याप्रकरणी प्रधान मुख्य वनसंरक्षक स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषीवर कारवाई करण्यासह यवतमाळ वन विभागातील 'कॅम्पा' निधीअंतर्गत गत पाच वर्षांत मंजूर व पूर्ण झालेल्या सर्व कामांचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत तसेच शासकीय निधीचा अपव्यय रोखण्यासाठी, वन विभागातील निविदा प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी व सार्वजनिक विश्वास अबाधित ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) ते (४) याबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ तसेच कॅम्पा अंतर्गत प्राप्त निधीमध्ये कोणतीही आर्थिक अनियमितता झालेली नाही. तथापि, रेल्वे विभागाच्या वर्धा-नांदेड-यवतमाळ या रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र शासनाने दिनांक ०३.०७.२०२३ व दिनांक ०४.०९.२०२४ च्या पत्रान्वये अनुक्रमे तत्वत: व अंतीम मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रकल्पासाठी झाडे प्रत्यारोपणासाठी रु. ५ कोटी इतका निधी हिंगोली व पुसद वनविभागाकरीता प्राप्त झाला होता.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांच्या अहवालानुसार उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०२१ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दिनांक २०.०५.२०२१ नुसार वनविभागाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे कार्यवाही झालेली आहे. सदर कामे ही दरपत्रकाद्वारे करण्यात आली आहेत. ज्या कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आला, त्यांनाच धनादेशाद्वारे रक्कम अदा केल्याचे सदर अहवालामध्ये नमूद आहे. तथापि, याबाबत विशेष लेखापरीक्षण पथकामार्फत चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

(५) व (६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांच्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी पुसद वन विभागांतर्गत बेलगव्हाण, शिरवळ व नागवडे नियत क्षेत्रांमध्ये २५२ वृक्षांच्या प्रत्यारोपणाचे काम झालेले नाही. शेंबाळपिंपरी वनपरिक्षेत्रात शिळोणा परिमंडाळातील शिळोणा व नागवाडी या नियतक्षेत्रात एकुण २१४ वृक्षांच्या प्रत्यारोपणाची कामे सन २०२४-२५ मध्ये झालेली असून सदर कामाकरीता रु. ७६,८१,११३/- एवढा निधी खर्च झाला आहे. सदर ठिकाणी जिवंत रोपांची संख्या एकूण १२६ असून जिवंत रोपांची टक्केवारी ५८.८० % आहे. रेल्वे विभागाकडून झाडे प्रत्यारोपणासाठी हिंगोली व पुसद वनविभागाकरीता रु. ५ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी पुसद वनविभागाकरीता रु.४,५६,८२,८३१/- एवढा निधी प्राप्त झाला असून, त्यातून ५ ठिकाणी (शिळोणा, रोहणा, नागवाडी, धुंदी व जवाहर नगर) ११७६ रोपांचे प्रत्यारोपण झालेले आहे. सदर ठिकाणी जिवंत रोपांची संख्या ८२८ असून जिवंत रोपांची टक्केवारी ७०.४१ % आहे. प्रत्यारोपणासाठी रु.४,२२,५९,८०४/-, वृक्षांना पाणी व संरक्षणाकरीता रु.२४,७३,९६८/-, मुरूम रोड व सोलर पंप साठी रु.२,६९,४८१/- असे एकूण रु.४,५०,०३,२५३/- एवढा निधी खर्च झाला आहे. रु.६,७९,५७८/- एवढा निधी अखर्चित आहे.

प्राप्त निधी व त्यानुसार झाडे प्रत्यारोपणाची केलेली कार्यवाही या अनुषंगाने दस्ताऐवज व निधी वितरणासंबंधी तपासणी करण्यासाठी विशेष लेखापरीक्षण पथकामार्फत चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

तसेच, प्रत्यारोपन केलेल्या क्षेत्राची मौका तपासणी करणेकरिता विभागीय वन अधिकारी दक्षता यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली असून सदर समित्यांची कार्यवाही चालू आहे. उपरोक्त दोन्ही समित्यांचा अहवाल तातडीने सादर करण्याबाबत शासनाच्या दिनांक २५.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. उक्त अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात जमीन मोजणी संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) * ३५४६० श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जमीन मोजणीसंदर्भातील सुमारे ३ कोटी १२ लाख प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक, कायदेशीर व प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय भूमापकांची संख्या अपुरी असल्यामुळे जमीन मोजणीच्या प्रकरणांसाठी ९० ते १२० दिवसांचा कालावधी लागत असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने परवानाधारक खाजगी भूमापक नियुक्त करण्याबाबत अधिसूचना जारी केली आहे काय तसेच या खाजगी भूमापकांसाठी कोणती तांत्रिक पात्रता, प्रशिक्षण व परवाना निकष निश्चित करण्यात आले आहेत,

(४) असल्यास, खाजगी भूमापकांकडून करण्यात येणाऱ्या मोजणीमध्ये अचूकता, पारदर्शकता व कायदेशीर वैधता कायम राहण्यासाठी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उपअधीक्षक भूमी अभिलेख व नगर भूमापन अधिकारी यांच्यामार्फत तपासणी व प्रमाणनाची कोणती प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे,

(५) असल्यास, आधी मोजणी, मग खरेदीखत आणि त्यानंतर फेरफार ही नवीन प्रणाली राज्यभर लागू करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही सुरू आहे तसेच त्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जमीन मोजणी प्रक्रियेमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल नकाशे, जीआयएस प्रणाली व ऑनलाइन ट्रॅकिंग सुविधा लागू करून नागरिकांना पारदर्शक व वेळत सेवा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

सद्यस्थितीत राज्यात १,२८,२९० प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) राज्याचा मोजणी प्रकरणांचा निकाली करण्याचा सरासरी कालावधी १२१ दिवस इतका आहे.

(३) व (४) परवानाधारक भूमापक यांची मोजणीकामी नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाची शासन अधिसूचना दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सिमाचिन्हे) नियम, १९८९ च्या नियम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

सदर परवानाधारक भूमापक यांच्या नियुक्तीसाठी जिल्हास्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी तांत्रिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा, मानधन, प्रशिक्षण व परवाना, प्रशासकीय नियंत्रण, मोजणी प्रकरणांचे निकष याबाबी निश्चित करण्यास महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दिनांक २५ मार्च, २०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(५) व (६) इतर राज्यांमध्ये राबविण्यात येत असलेल्या कार्यप्रणालीच्या धर्तीवर जमीन खरेदीखत नोंदणीपूर्वी संबंधित मिळकतीची अधिकृत मोजणी करून तिचे अचूक क्षेत्रफळ, लांबी-रुंदी, चतु:सीमा, भौगोलिक स्थान (Coordinates) सह निश्चित करणे, त्यानंतरच खरेदीखताची नोंदणी करणे आणि नोंदणीनंतर फेरफार नोंद मंजूर करून अधिकार अभिलेख अद्ययावत करणे, अशी कार्यपद्धती राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने अभ्यास सुरू आहे.

हीी कार्यवाही राज्यात प्रभावीपणे लागू करण्यासाठी महसूल, नोंदणी व मुद्रांक, भूमी अभिलेख विभागाशी निगडीत संबंधित कायदे, नियम, कार्यपद्धती व प्रक्रियांमध्ये आवश्यक सुधारणा व दुरुस्ती करणे याची तपासणी करण्यात येत आहे.

-----------------

## बार्टीमार्फत (जि. पुणे) लोणावळा येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेतील शासकीय निधीच्या खर्चाबाबत

**(२३) * ३८३८० श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या वतीने समाजकल्याण विभागातील अधिकाऱ्यांसाठी लोणावळा येथील एका खाजगी लक्झरी रिसॉर्टमध्ये दिनांक ८ व ९ मे, २०२६ रोजी दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली व त्याकरिता मोठ्या प्रमाणात शासकीय निधी खर्च करण्यात आला असल्याचे दिनांक १५ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथे शासनाची यशदा (YASHADA) सारखी स्वतःची प्रशिक्षण संस्था व आवश्यक सुविधा उपलब्ध असतानाही सदर कार्यशाळेसाठी अंदाजे २० ते २५ लाख रुपये खर्च करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर कार्यशाळेसाठी कोणत्याही प्रकारची निविदा प्रक्रिया न राबविता खर्च करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बार्टी या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना विविध योजनेसाठी वेळेवर निधी उपलब्ध होत नसताना अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेवर मोठा खर्च करण्यात आल्याची चौकशी व विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्यावतीने करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे अंशत: खरे आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक २३ सप्टेंबर,२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण धोरण ठरविण्यात आले आहे. सदर धोरणानुसार समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना उजळणी प्रशिक्षण, पायाभूत प्रशिक्षण, नवीन विषयाची ओळख प्रशिक्षण, पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण इत्यादी प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेमार्फत दिनांक ८ ते १० मे, २०२६ या कालावधीत समाज कल्याण विभागातील गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांसाठी लोणावळा येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांचेकडे दिनांक ८ ते १० मे, २०२६ या कालावधीत कार्यशाळेसाठी तारखा उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले होते.

(३) हे खरे नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३ सप्टेंबर,२०११ च्या शासन निर्णयातील विवरणपत्र क्र. ड-१ मधील कार्यक्रम, बीटीएल आणि संप्रेषण उपक्रम (कम्युनिकेशन ॲक्टीव्हिटीज) यामधील तरतुदीनुसार सदरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणीमुळे कृषी यांत्रिकीकरण योजनांची पूर्वसंमती प्रक्रिया बंद असल्याबाबत

**(२४) * ३९४०४ श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांतील अनुदान पारदर्शक व सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू करण्यात आले असून सदर पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे कृषी यांत्रिकीकरण योजनांसाठीची पूर्वसंमती प्रक्रिया बंद असल्याचे दिनांक २२ मार्च, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२५-२६ या कालावधीत राज्यातील १ लाख १ हजार २३६ शेतकऱ्यांचे कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत अर्ज प्रलंबित असून सुमारे १२०० कोटी रुपयांचे अनुदान प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यात कृषी यांत्रिकीकरणासाठी सुमारे ६४ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी अर्ज केले असूनही पोर्टलवरील संबंधित टॅब बंद असल्यामुळे हजारो अर्ज प्रलंबित राहिले असून पूर्वसंमती मिळालेल्या अत्यल्प शेतकऱ्यांनाच अनुदानाचा लाभ मिळाला आहे, तसेच आष्टी (जि.बीड ) तालुक्यातील मच्छिंद्रनाथ ढोबळे या शेतकऱ्यास माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर सुमारे ६ लाख ९० हजार रुपये किमतीचा ३६HP ट्रॅक्टर खरेदी केला असून अद्यापही त्यांना अनुदान प्राप्त झाले नसल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगांव व राहाता तालुक्यातील महाडिबीटी अंतर्गत भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, राज्य कृषी यांत्रिकीकरण व कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान या योजनांचे सन २०२५ -२०२६ मधील रु.१९ कोटी ९१ लक्ष एवढे अनुदान अद्यापही वितरित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच कोकणातील, विशेषतःचिपळूण व संगमेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर राज्य कृषि यांत्रिकीकरण, कृषि यांत्रिकीकरण उपअभियान, स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना तसेच MIDH अंतर्गत पॅक हाऊस आदी योजनांसाठी ऑनलाईन अर्ज केले असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या धोरणानुसार काही शेतकऱ्यांची निवड झाली असली तरी अनेक लाभार्थ्यांना अद्यापही पूर्वसंमती मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महाडीबीटी पोर्टल तातडीने सुरळीत करून कृषी यांत्रिकीकरण योजनांची पूर्वसंमती प्रक्रिया पुन्हा सुरू करणे, प्रलंबित अर्ज निकाली काढणे तसेच सर्व प्रवर्गातील शेतकऱ्यांना वेळेत अनुदानाचा लाभ उपलब्ध करून देणे तसेच कोकणातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा विचार करून महाडीबीटी पोर्टलवरील सर्व योजनांसाठी लाभार्थी निवड दरमहा करण्याबाबत तसेच प्रलंबित अर्जदारांना तातडीने पूर्वसंमती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत निधी उपलब्धतेनुसार पुरेशा प्रमाणात पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय अंशत:खरे आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत ३६,०३,३३८ अर्जांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत ४,३८,५४७ अर्ज प्रक्रियेत असून २,३८,१३६ अर्जांना पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी १,५६,५८१ अर्जांना अनुदान अदा करण्यात आलेले आहे. उपलब्ध निधीनुसार प्रलंबित अर्जांना अनुदान अदायगी करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत अकोला जिल्ह्यामध्ये ६९,८९८ अर्जांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत ६,४७४ अर्ज प्रक्रियेत असून ३,८०१ अर्जांना पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी २,४३८अर्जांना अनुदान अदा करण्यात आलेले आहे.आष्टी (जि. बीड) तालुक्यातील मच्छिंद्रनाथ ढोबळे या शेतकऱ्याचे दिनांक ४ मे, २०२६ रोजी रु.१.०० लाख अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(४) हे खरे नाही.

सन २०२५-२६ प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रति थेंब अधिक पिक योजनेंतर्गत कोपरगाव तालुक्यात माहे मे २०२६ अखेर ३०० लाभार्थींचे ५६.५३ लाख व राहाता तालुक्यात ४०४ लाभार्थींचे ८५.४६ लाख अनुदान वर्ग करणे प्रलंबित आहे. सन २०२५-२६ भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अंतर्गत कोपरगाव तालुक्यात माहे मे २०२६ अखेर ५ लाभार्थींचे रु.१.६५ लाख व राहाता तालुक्यात २५ लाभार्थींचे रु.११.२८ लाख अनुदान वर्ग करणे प्रलंबित आहे.

सन २०२५-२६ राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकिकरण योजनेतंर्गत कोपरगाव तालुक्यामध्ये २२७ लाभार्थ्यांचे रक्कम रु.४२१.०१ लाख अनुदान वर्ग करणे प्रलंबित आहे. तसेच राहाता तालुक्यामध्ये १३० लाभार्थ्यांचे रक्कम रु.२३८.१४ लाख अनुदान वर्ग करणे प्रलंबित आहे.योजनेंतर्गत निधी प्राप्त होताच लाभार्थ्यांचे अनुदान वर्ग करणेची कार्यवाही करणेत येईल.

(५) हे खरे नाही.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत चिपळूण व संगमेश्वर तालुक्यात २०१४अर्जांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत ७१२अर्ज प्रक्रियेत असून ५३७ अर्जांना पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत चिपळूण व संगमेश्वर तालुक्यात ६७ अर्जांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत ५२ अर्ज प्रक्रियेत असून २५ अर्जांना पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकात्मिक फलोत्पादन विकास

अभियान योजनेंतर्गत पॅक हाऊस साठी चिपळूण व संगमेश्वर तालुक्यात ३७ अर्जांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत १८ अर्ज प्रक्रियेत असून १७ अर्जांना पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे.
(६) सद्यस्थितीत महाडीबीटी पोर्टलवरील विविध योजनांमध्ये निधी उपलब्धतेनुसार पुर्वसंमती चालु आहेत. तसेच पुर्वसंमती प्रदान केलेल्या अर्जांवर योग्य ती कार्यवाही करुन अनुदान अदायगीची प्रक्रिया चालु आहे.
(७) संबंधित नाही.

-----------------

## राज्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी मार्जिन मनी योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(२५) * ३३२१० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या स्टॅण्ड अप इंडिया योजनेच्या अनुषंगाने राज्य शासनाने सुरू केलेली मार्जिन मनी योजना मागील ३६० दिवसांत नागपूर विभागामध्ये पूर्णतः निष्क्रिय (शुन्य) असून या कालावधीत एकही अर्ज प्राप्त झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर विभागात सन २०१९ पासून या योजनेंतर्गत केवळ ४२ लाभार्थ्यांना एकूण ३५.३० कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले असून, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात एकाही लाभार्थ्यास लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेत शासनाकडून १० लाख ते १ कोटी रु पर्यंतचे कर्ज दिले जात असताना या योजनेत राज्य शासनाकडून १५ टक्के मार्जिन मनी दिला जात असून, इतर काही शासकीय योजनांमध्ये २५ ते ३५ टक्केपर्यंत मार्जिन मनी उपलब्ध असल्याने लाभार्थी त्या योजनांकडे वळत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बँक कर्ज (७५ टक्के) व १० टक्के स्वहिस्सा असूनही मार्जिन मनी योजना कमी आकर्षक व प्रचलित नसल्यामुळे नवउद्योजकांकडून सदर योजनेस प्रतिसाद मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त योजनेंतर्गत अर्जदारला १० टक्के रक्कम भरावी लागत असताना, माहितीचा अभाव व बँकाच्या जाचक अटींमुळे धाराशिव जिल्ह्यात वर्षभरात एकही अर्ज आला नसल्याने सदरची योजना दुर्लक्षित ठरली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नागपूर विभागात उक्त योजनेच्या अपयशाची कारणे शोधून लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी तसेच धाराशिवसह राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये या योजनेचा प्रभावी प्रसार करुन तसेच अर्जदाराला मार्गदर्शन,प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी, तांत्रिक सहाय्य व बँकांकडून कर्ज मंजूरीसाठी विशेष समन्वय यंत्रणा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.
(२) भंडारा व गोंदिया जिल्ह्यात एकाही लाभार्थ्यास लाभ मिळाला नाही, हे खरे आहे.
(३) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक यांना १० % स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत ७५ % कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरीत १५ % मार्जिन मनी राज्य शासनामार्फत देण्यात येते.
(४) अंशत: खरे आहे.
(५) हे खरे आहे.

(६) नागपूर विभागात व धाराशिव जिल्ह्यात सदर योजनेची वर्तमानपत्रात नियमित जाहिरात प्रसिध्दी करण्यात येते, कार्यशाळा घेण्यात येतात व समतादुतामार्फत प्रचार प्रसिध्दी करण्यात येते तसेच सदर योजनेच्या माहिती पुस्तीकांची छपाई करून वाटप करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी येथील कोकण किनारपट्टीवर एलईडीद्वारे मासेमारी करण्यात येत असल्याबाबत**

**(२६) * ३२६१० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एलईडीद्वारे मासेमारी करण्यास बंदी असतानाही रत्नागिरी येथील कोकण किनारपट्टीवरील समुद्रात एकाच वेळी शेकडो बोटी एलईडीच्या माध्यमातून मासेमारीचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बेकायदेशीर मासेमारीमुळे पारंपरिक मच्छीमारांचे भवितव्य धोक्यात आले असून खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना मासे मिळत नसल्यामुळे परिणामी त्यांच्या उपजीविकेवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांचे एलईडी नौका मालकांशी असलेले संगनमत यामध्ये होणारा गैरव्यवहार, त्यातून अधिकाऱ्यांचे या बेकायदेशीर मासेमारीकडे होणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, कठोर कारवाई न करता कारवाईच्या दिखाऊपणामुळे शासनच एलईडी मासेमारीला सहकार्य करीत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह एलईडीद्वारे मासेमारी बंदी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

शासन अधिसूचना दिनांक २७ एप्रिल, २०१८ अन्वये राज्याच्या जलधी क्षेत्रात एलईडी लाईट साहित्य वापरुन मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात प्रतिबंध असलेल्या एलईडी लाईट साहित्य वापरून अनधिकृत मासेमारी करित असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अनधिकृत एलईडी मासेमारी नौकांवर सागरी कायद्यातील तरतुदीन्वये कठोर कारवाई करण्यात येत असते.
(२) मागिल तीन वर्षाची मत्स्योत्पादनाची आकडेवारी पाहता मत्स्योत्पादनात घट झालेली असल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

एलईडी लाईट साहित्य वापरुन करण्यात येणा-या अनधिकृत मासेमारीस प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने सुधारीत सागरी कायद्यातील तरतुदीनुसार अनधिकृत एलईडी मासेमारी नौकेस जास्तीस जास्त शास्तीची तरतुद करण्यात आलेली आहे.सद्यस्थितीत रत्नागिरी जिल्ह्यात एक अतिवेगवान गस्ती नौका व ०३ ड्रोनच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सागरी हद्दीत प्रभावी गस्त घालुन निदर्शनास येणा-या अनधिकृत मासेमारी नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ कायद्यातील तरतुदीन्वये दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ ते माहे मे, २०२६ अखेर एकुण १३१ अनधिकृत एलईडी मासेमारी नौकांवर कारवाई करण्यात आलेली असून यापासुन रु.१.५९ कोटी इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेत विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना अत्यल्प परतावा मिळत असल्याबाबत

**(२७) * ३३२४० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पंजाब, गुजरात, बिहार आणि पश्चिम बंगाल यांसारखी महत्त्वाची राज्ये केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून बाहेर पडली असून महाराष्ट्र मात्र या योजनेत अद्यापही सहभागी असल्याने राज्याच्या तिजोरीवर विमा हप्त्याचा मोठा आर्थिक भार पडत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरात राज्याने विमा कंपन्यांनी ४,५०० कोटी रुपयांचा अतिरिक्त हप्ता मागितल्याने या योजनेतून माघार घेऊन शेतकऱ्यांसाठी स्वतःची स्वतंत्र योजना राबविली आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने विमा कंपन्यांची नफेखोरी रोखण्यासाठी स्वतःची स्वतंत्र ‘राज्य पीक विमा योजना’ राबविणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेलंगणा, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी ज्याप्रमाणे विमा कंपन्यांच्या जाचक अटींऐवजी शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्याचे धोरण अवलंबविले आहे, त्याच धर्तीवर राज्यात ‘बीड मॉडेल’ किंवा तत्सम प्रभावी उपाययोजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ‘प्रधानमंत्री पीक विमा योजनेत’ विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना मिळणारा अत्यल्प परतावा आणि निकषांमधील त्रुटींबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय,

(२) नाही,

(३) सद्यस्थितीत राज्यात बीड पॅटर्न Cup & Cap Model (८०:११०) नुसार पीक उत्पादनावर अधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार, पिकांच्या उत्पादनात उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत झालेल्या घटीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येते.

(४) सन २०१६ ते २०२५ दरम्यान प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत जमा प्रिमियमच्या तुलनेत शेतकऱ्यांना ७१ टक्के परतावा मिळाला आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या निकषांतील सुधारणांबाबत केंद्र शासनाकडून कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.